महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५७ वे | दिनांक : ०१/०६/२०२६ | वार : सोमवार

## महाराष्ट्र 'उडता पंजाब' झालाय; राजू शेट्टींचा देवेंद्र फडणवीसांवर हल्लाबोल





**कोल्हापूर :** "सत्ता आणि हव्यासापोटी निर्माण झालेल्या वसुली व्यवस्थेमुळे महाराष्ट्र बरबाद होऊन 'उडता पंजाब' झाला आहे, हे आता मान्य करा. राज्यात अवैध धंद्यांचा महापूर आला असून गल्लीबोळातील बेकायदा व्यवसायांची यादीच मी तुम्हाला पाठवू शकतो," अशा जळजळीत शब्दांत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर तोफ डागली आहे. सिंधुदुर्ग पोलिसांवर गंभीर आरोप करणाऱ्या आमदार निलेश राणे यांचा व्हिडिओ शेअर करत शेट्टी यांनी राज्य सरकारवर जोरदार हल्ला चढवला.

राजू शेट्टी यांनी निलेश राणे यांच्या विधानाचा दाखला देत म्हटले की, महाराष्ट्राची वाटचाल उडता पंजाबसारखी झाली आहे. या वाक्यावर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी मी महाराष्ट्र बदनाम करत असल्याचे वक्तव्य करून त्याला दुजोरा दिला. होय देवाभाऊ तुमच्यासारख्या अकार्यक्षम नेतृत्वामुळे महाराष्ट्र बदनाम नव्हे बरबाद होत आहे. तुमच्याच महायुतीतील शिवसेना शिंदे गटाचे आमदार निलेश राणे यांनी पोलिस खात्यावर केलेले हे आरोप ऐका. एका सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पोलिस जर दोन ते अडीच कोटीची कमाई करत असतील तर महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातील परिस्थिती काय असेल याचा अंतर्मुख होवून विचार करा.

निलेश राणे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एका पोलिसाची कमाई दोन ते अडीच कोटी असल्याचे म्हटले होते. त्यावरुन शेट्टी यांनी राज्यातील कोल्हापूर, सांगली, पुणे, मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहरांतील वसुलीचा आकडा शेकडो कोटींच्या घरात असल्याचा दावा केला. त्यांनी पोलिसांच्या हप्तेखोरीचे कथित सरासरी दरही सांगितले.

मटका अड्डा: १५ ते २५ हजार रुपये प्रति महिना. अवैध दारू विक्री: १० ते १५ हजार रुपये प्रति महिना. अंमली पदार्थ (ड्रग्स): ७५ हजार ते १.५० लाख रुपये प्रति महिना. गांजा विक्री: २५ ते ५० हजार रुपये प्रति महिना. अवैध लॉज व्यवसाय: १० ते १५ हजार रुपये प्रति महिना. याप्रमाणे पोलिसांचे सरासरी दर ठरले असून ज्यांची विक्री व व्यवसाय जास्त जास्त आहेत त्यांचे दर तर गगनाला भिडलेले असल्याचे राजू शेट्टी म्हणाले.


राजू शेट्टी यांनी आरोप केला की, पोलिस ठाण्यातील बीट अंमलदारापासून ते जिल्हा पोलिस प्रमुख कार्यालयातील स्थानिक गुन्हे शाखा आणि गुप्तचर शाखेच्या निरीक्षकांना सर्व अवैध अड्डे माहित आहेत. "एखाद्या ठिकाणी पोलिस कारवाई करणार असतील, तर त्याआधीच संबंधित मालकांना 'टीप' देऊन सावध केले जाते. पोलिसांच्या याच आशीर्वादामुळे अमली पदार्थ आणि अवैध धंद्यांनी तरुणाई बरबाद होत आहे," असे त्यांनी नमूद केले.

देवेंद्रजी तुमच्या सत्तेच्या हव्यासापोटी होत असलेल्या या " वसुली " व्यवस्थेमुळे महाराष्ट्र बरबाद होवून उडता पंजाब झाला आहे हे मान्य करा. अजून गावनिहाय, शहरनिहाय कोणत्या गल्लीत काय काय अवैद्य व्यवसाय सुरू आहेत याची यादीही पाठवू शकतो.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

## वडेट्टीवारांच्या टीकेनंतर जरांगे आक्रमक; काँग्रेसवर साधला निशाणा



**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे शेतात शनिवारी सकाळी भर उन्हात सुरू केलेले बेमुदत उपोषण १५ तासांनंतर सोडले. त्यानंतर सरकारच्या एकंदरीत भूमिकेवर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी डबल ढोलकी सरकार म्हणत सडकून टीका केली आहे. तसेच लक्ष्मण हाके यांनी देखील तत्परता नव्हे तर सरकारची लाचारी म्हणत टीका केली होती. यावर आता मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे सध्या गॅलक्सि रुग्णालायत दाखल असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. यावेळी भाजप नेते प्रसाद लाड यांनी त्यांची रुग्णालयात जाऊन भेट घेतली आहे.

मनोज जरांगे पाटील म्हणाले, विजय वडेट्टीवार यांचे काँग्रेसचे सरकार असताना ओबीसींचे कल्याण केले होते का? झोके बांधून दिले होते का? काही बोलतात. ते काय धडाचे होते का? हे पण काही धडाचे नाहीत, यांनी पण मराठा आणि ओबीसी समाजासाठी काही नाही केले. आपल्या जनतेला कळत नाही का? आपण दोघांनी मिळून, ओबीसी आणि मराठा सगळ्यांनी मिळून सरकार विरोधात झुंजले पाहिजे. ते आपल्यात वाद लाऊन देतात आणि आपण सुरू.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर देखील विजय वडेट्टीवार यांनी टीका केली होती. त्यावर विचारले असता मनोज जरांगे पाटील म्हणाले, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री ओबीसी आरक्षणाला धक्का लावतच नाहीत. आमचे जे हक्काचे आहे ते देत आहेत. आमच्या नोंदी सापडल्या आहेत तेच आपल्याला देणार आहेत. त्यांना धक्का लाऊही नका. पण आमच्या नोंदी आमच्या गॅझेटनुसार तर द्यावेच लागेल.

मनोज जरांगे पुढे म्हणाले, कॉंग्रेसने सुद्धा ओबोसीचे वाटोळे केले होते. महायुतीच्या सरकारने सुद्धा तेच केले आहे. मराठा आणि ओबीसीने समजून घेतले पाहिजे की आपण दोघांनी मिळून सरकारच्या विरोधात राहिले पाहिजे. तुम्ही सरकारकडून राहतात आणि आमच्या विरोधात बोंबलतात. दरम्यान, विजय वडेट्टीवार यांनी ओबीसी समाजासाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे, त्यावर जरांगे म्हणाले, रस्त्यावर उतरा नाहीतर ओढ्यात उतरा, कुठेही उतरा, असे म्हणत टोला लगावला आहे.

उपोषण सुरू असताना मनोज जरांगे यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांना म्हटले होते की माझी नार्को टेस्ट करा आणि अजुन एकाची करा, यावर प्रश्न विचारला तेव्हा जरांगे म्हणाले, मला वाटले होते बदल झाला पाहजे. ते परळीचंच म्हणाला होता की माझी नार्को टेस्ट करा. मी नव्हतं काही म्हटले. त्यामुळे तो विषय आता मी पुन्हा हातात घेतो. त्याने कोणाला घातपात करायला लावला होता माझा? त्याला कोण पीए भेटायला जात होता परळीमध्ये, त्यात आरोपी कोण करायला पाहिजे होता, त्या आरोपींना कोण साथ देत आहे, हे सगळे आता मी लावून धरणार आहे, असे म्हणत धनंजय मुंडे यांच्यावर जरांगे यांनी इशारा दिला आहे.

कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी मनोज जरांगे यांच्या एकंदरीत आंदोलनावर तसेच सरकारच्या भूमिकेवर सडकून टीका केली आहे. ते म्हणाले, डबल ढोलकी सरकारने पुन्हा आरक्षणाच्या मुद्द्यावर मराठा आणि ओबीसीच्या हातात घंटा देण्याचे काम सुरू केले आहे, असे मला दिसत आहे. काल जरांगे पाटील उपोषणाला बसले आणि त्यामध्ये सरकारकडून विखे पाटलांच्या आणि प्रसाद लाड यांच्या उपस्थितीत निघाला, खरे तर या तोडग्यात ५८ लाख ज्या काही नोंदी सापडल्या आहेत, त्यांना कुणबी प्रमाणपत्र द्यायचे म्हणजेच ओबीसीमध्ये समाविष्ट करायचे, हा निर्णय काल झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ जून २०२६

## तुगाव येथील पीडित दलित कुटुंबाला न्याय मिळावा सर्वस्तरातून मागणी उमरगा येथे रास्तारोको आंदोलन



**उमरगा (प्रा.नागसेन कांबळे) :** तालुक्यातील तुगाव(येणेगुर) येथील एका दलित कुटुंबातील पीडित भालचंद्र चोखोबा कांबळे याला जातीयवादी गुंडांनी जेवायला घेऊन जातो म्हणून शेतात नेऊन लाथा, बुक्क्या आणि बेल्ट व रॉडने बेदम मारहाण करत महारड्या दोन दोन जयंती काढता , तुम्हाला खूप माज आलाय, आम्हाला ओळखतो का आम्ही कोण आहोत असे म्हणत पशुपेक्षा हीन वागवत अत्यंत हिंस्र पद्धतीने हल्ला केला. यात भालचंद्र गंभीररित्या जखमी झाला असून त्याला तातडीने शासकीय रुग्णालयात हलविण्यात आले होते. आरोपी रोहित दीपक जोमदे, पंकज शंकर जोमदे, महेश गहिनीनाथ जोमदे, चाँद फकीर यांपैकी चांद फकीर याला मुरूम पोलिसांनी तत्काळ अटक केली असून चौघांविरोधात अँस्ट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला असून बाकी तीन आरोपी फरार आहेत.गुन्हा घडून अनेक दिवस झाले तरी आरोपीचा पत्ता कसा काय लागत नाही,त्यांना कुणाचे अभय आहे,संबंधित आरोपी शिवसेना शिंदे गटाशी संबधित असून पोलिसांवर कोणाचा राजकीय दबाव आहे असा संतप्त सवाल केला जात आहे. यापूर्वीही तुगाव गावात या बेशिस्त आणि बेताल सुटलेल्या नराधमांनी अनेकाना विनाकारण मारत आपली दहशत पसरविण्याचा प्रयत्न केला आहे.सदरील प्रकरणात अठरा मे रोजी गुन्हा घडला असून अजूनपर्यंत आरोपी सापडत नाहीत त्यामुळे संबंधित कुटुंबाची सहनशीलता संपत चालली असून विविध सामाजिक आणि राजकीय कार्यकर्ते भालचंद्र कांबळे कुटुंबाला आधार देण्यासाठी विविध भागातून येत आहेत.यासंदर्भात ११ मे रोजी मुरूम पोलिस स्टेशन मध्ये रीतसर गुन्हा नोंद होऊनही आज इतके दिवस होत आहे तरी गुन्हेगार कसे काय सापडत नाही असा संतप्त सवाल करत आंदोलक आक्रमक झाले.जोपर्यंत तहसीलदार स्वतः निवेदन स्वीकारायला येत नाहीत तोपर्यंत आम्ही इथून अजिबात हटणार नाही या म्हणण्यावर आंदोलक ठाम होते. जर चार दिवसात पोलिसांनी आरोपीला अटक केली नाही तर यापेक्षा मोठे आंदोलन उभे करण्यात येईल आणि जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढून तीव्र आंदोलन उभारण्यात येईल असे सांगून आज दि .२९.०५.२०२६ रोजी त्याचाच भाग म्हणून तीव्र रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यात गावातील शेकडो महिला, पुरुष, आणि उमरगा तालुक्यातील विविध संघटनेची पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येनी उपस्थित होते.या रस्ता रोको आंदोलनात रिपब्लिकन पार्टीचे तुळजापूर तालुका अध्यक्ष अरुण लोखंडे, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब मस्के, हरीश डावरे, एस. के. चेले, बाबासाहेब गायकवाड, संजय कांबळे, धीरज बेलंबकर, दगडू भोसले, यशवंत भंडारे, प्रतीक सूर्यवंशी, महिला अध्यक्ष अशा कांबळे, सुमन गायकवाड यांच्यासह अनेक कार्यकर्ते आणि विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. शेवटी तहसीलदार गोविंद येरमे हे घटनास्थळी येऊन निवेदन स्वीकारल्यानंतर आंदोलक शांत झाले पण आरोपीला शोधून काढण्याच्या प्रक्रियेत शैथिल्य दाखवल्यास आणखी आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## कौसडी येथे बारा गोवंशाची कत्तल



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** तालुक्यातील कौसडी या गावात एका निवासस्थानी दिनांक 30 मे रोजी दुपारी एक वाजता गोवंशाची १२ डोके व १ धड सापडले.घटनेतील मुख्य आरोपी फरार असून सपोनि रामेश्वर धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी गुन्हा नोंद करून घेण्याची प्रक्रिया चालू होती. जिंतूर तालुक्यातील कौसडी या गावात ही घटना पोलिसांच्या धाडसी कार्यवाहीमुळे उघडकीस आली. पोलीस ठाण्याचे सपोनि रामेश्वर धोंडगे यांच्या नेतृत्वात बीट जमादार राजेश जटाळ यांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने ही धाडसी कार्यवाही शनिवार दि. ३० मे रोजी केली. पोलिसांना याबाबत नागरिकांकडून गुप्त माहिती मिळाली होती. सपोनि धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार जटाळ यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह सदर ठिकाणी गुप्तपणे धाड टाकली. या ठिकाणी बैलांची १२ मुंडके व मृत अवस्थेत असलेला एक बैल तसेच धारदार हत्यारे त्यांच्या निदर्शनास आली. या कार्यवाहीत पोलीस कर्मचारी प्रकाश मोरे व संघसेन कांबळे यांचा सहभाग होता. जिंतूर तालुक्यात या घटनेमुळे मोठी खळबळ निर्माण झाली आहे. बोरी व कौसडी परिसरातील नागरिकांमधून बैलांच्या निर्घृण कत्तलीमुळे हळहळ व्यक्त होत असून आरोपीला व त्याच्या या दुष्कर्मात सहभागी असलेल्यांना कठोर शासन करावे; अशी मागणी जोर धरत आहे.

## १ जून पासून वादळी पावसाचा अंदाज, मात्र शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**बीड (भगवंत पाळवदे) :** सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदर्भातील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही. कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी:* शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये* विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे.

## उपचारासाठी पैसे घेऊन निघालेल्या तरुणाचा दुर्दैवी अंत



**जिंतूर (बी.डी.रामपूरकर)** पासून जवळच असलेल्या रायखेडा पाटीजवळ अज्ञात वाहनाची धडक; मित्र गंभीर जखमी, दताड गावावर शोककळाकुटुंबातील एका सदस्याच्या जीवासाठी धडपड सुरू असतानाच दुसऱ्या मुलाचा अपघाती मृत्यू झाल्याने हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील दताड गावावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. कोमात असलेल्या भावाच्या उपचारासाठी पैशांची व्यवस्था करून संभाजीनगरकडे निघालेल्या तरुणाचा जिंतूर तालुक्यातील रायखेडा पाटीजवळ भीषण अपघातात मृत्यू झाला. या अपघातात त्याचा मित्र गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, अनिल देविदास सुर्वे (वय २५, रा. दताड, ता. सेनगाव, जि. हिंगोली) हे आपल्या मित्र संकेत दत्ता बळे (वय २५) यांच्यासोबत दुचाकीवरून संभाजीनगरकडे जात होते. अनिल सुर्वे यांचा भाऊ गेल्या दीड महिन्यांपासून संभाजीनगर येथील एका खासगी रुग्णालयात कोमामध्ये असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाची जुळवाजुळव करून अनिल सुर्वे हे रुग्णालयात जाण्यासाठी रवाना झाले होते.रविवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास जिंतूर-परभणी मार्गावरील रायखेडा पाटीजवळ त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दुचाकीचा चक्काचूर झाला आणि दोघेही रस्त्यावर फेकले गेले. अपघातानंतर घटनास्थळी काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली. जखमी अवस्थेतील दोघांनाही तातडीने जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच अनिल सुर्वे यांची प्रकृती अत्यंत गंभीर झाली होती. वैद्यकीय अधिकारी डॉ. शेख अजीज यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. तर संकेत बळे यांच्या डोक्याला, हाताला व पायाला गंभीर दुखापत झाल्याने प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले.या घटनेतील सर्वात हृदयद्रावक बाब म्हणजे अनिल सुर्वे हे स्वतःच्या भावाच्या जीवासाठी धावपळ करत होते. कुटुंबातील एक मुलगा मृत्यूशी झुंज देत असताना दुसऱ्या मुलाचा अपघाती मृत्यू झाल्याने सुर्वे कुटुंबावर दुहेरी संकट ओढवले आहे. अनिल सुर्वे यांच्या पश्चात पत्नी व एक लहान मुलगा असा परिवार असून त्यांच्या निधनाने दताड गावात शोककळा पसरली आहे. गावातील नागरिक, नातेवाईक आणि मित्रपरिवाराने सुर्वे कुटुंबीयांच्या दुःखात सहभाग नोंदवत हळहळ व्यक्त केली आहे.घटनेची माहिती मिळताच चारठाणा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मुजाजी दळवे, पोलीस हेडकॉन्स्टेबल उद्धव माने व हरिभाऊ गायकवाड यांनी घटनास्थळ व रुग्णालयात भेट देऊन पंचनामा केला. अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून अपघाताचा पुढील तपास चारठाणा पोलीस करीत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ जून २०२६


## आमचा संजू

आमचा संजू
फार फार गुणी
स्पष्ट त्याचा उच्चार
मधूर त्याची वाणी

विविध कार्यक्रमात
भाषण करतो मुखपाठ
टाळ्यांच्या कडकडाटात
गुरूजी थोपटतात पाठ

लिहितांना नसे खोडतोड
अक्षर त्याचे वळणदार
कधीच खात नाही
गुरूजींचा मार

शाळेतून घरी येताच
गृहपाठ करतो
रोज सायंकाळी
शुभंकरोती म्हणतो



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## फुला समान फुलावे

प्रीत तुझी माझी आता,
फुला समान फुलावे.
पाहताच तुला पुढे,
खळी गालात खुलावे. १

तुझ्या प्रीतीने सजणी,
मनी उत्साह भरला.
तुला प्राप्त करण्याचा,
माझा करार ठरला. २

तुझ्या प्रीतीच्या छायेत,
मन मोहरून आले.
प्रेम तुझे मिळताच,
मन आनंदीत झाले. ३

प्रीत तुझी माझी अशी,
साऱ्या जगाला कळावे.
तुझे माझे नाव घेता,
दूर निराशा पळावे. ४

प्रीत तुझी माझी प्रिये,
फुला समान फुलावे.
प्रेम आपले पाहून,
जग प्रेमात झुलावे. ५

**- नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

# माता रमाई व माईसाहेब यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन




**छत्रपती संभाजीनगर :** माता रमाई आंबेडकर व माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रबुद्ध युवा परिवर्तनवादी विचार मंच आणि अवलोकितेश्र्‌ वर प्रॉडक्शन्स यांच्या संयुक्त विद्यमाने परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.प्रा. डॉ. प्रज्ञा साळवे व सेवानिवृत्त प्रा. कीर्तीलता पेटकर यांनी याप्रसंगी आपले विचार मांडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राध्यापिका उज्वला खोब्रागडे होत्या. हा कार्यक्रम मराठवाडा साहित्य परिषद सभागृह येथे दिनांक २९ मे २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता झाला. परिसंवादात बोलताना डॉ. प्रज्ञा साळवे यांनी रमाई आणि माईसाहेब यांच्या जीवनाविषयी इतिहासात झालेल्या चुकीच्या मांडणी आणि नोंदणीवर परखड भाष्य केले. त्यांनी आंबेडकर कुटुंबाच्या इतिहासाचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज व्यक्त केली. सेवानिवृत्त प्राध्यापिका कीर्तीलता पेटकर यांनी माईसाहेबांच्या जीवन आणि कार्यावर विस्तृतपणे प्रकाश टाकला. याप्रसंगी "माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर" या चित्रपटाच्या वेशभूषेसाठी राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल छाया त्रिभुवन (हनी कॉश्च्युम) यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे व्यासपीठावरील प्रमुख वक्ते, अध्यक्ष, सूत्रसंचालक, प्रास्ताविक आणि पाहुण्यांचे स्वागत हे सर्व कार्य फक्त महिलांनीच केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आम्रपाली त्रिभुवन तर प्रास्ताविक प्रा. डॉ. चित्रा त्रिभुवन यांनी केले. रमाई आणि माईसाहेब यांचा संयुक्त स्मृतिदिन प्रथमच आयोजित करण्यात आला. अध्यक्षीय समारोप भाषणाऐवजी कवितेद्वारे करण्यात आला. माईसाहेबांच्या जीवनाचे विविध पैलू उलगडताना त्यांनी त्यांचा संघर्ष, त्याग आणि विशेषतः बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी केलेले प्रयत्न यांची माहिती दिली. समाजातील गैरसमज आणि अनेक टीका पत्करून त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत प्रामाणिकपणे कार्य केले, याबद्दलही त्यांनी भाष्य केले.अॅड. नरहरी कांबळे (अध्यक्ष, प्रजेना संघ), श्रावण गायकवाड (अध्यक्ष, आंबेडकर संघर्ष समिती), प्रा. डॉ. इंजि. पद्मपाणी त्रिभुवन, प्रा. श्रीकिशन मोरे, से. नि. प्राचार्य ग. राठोड, से. नि. प्राचार्य व्ही. ए. रामटेके, डॉ. भगवान धांडे, डॉ. यशवंत खडसे, मधुकर काळे, सिद्धार्थ निकाळजे, दीपक जावळे, मच्छिंद्र दुशिंग, राजू पटेकर, राजू जगताप, एन. टी. भगत, रमेश गायकवाड, चंद्रकांत थोरात, शिवशिंग भारतवार, अर्जुन चव्हाण, संजय केदार, डॉ. दिवेकर, एन. डी. जीवने, एम. टी. रावते, शाहीर उत्तम म्हस्के, रामदास अभ्यंकर, सुभाष पळसकर, डॉ. अर्चनाताई गणवीर,पुष्पा मोरे, रिना भस्मे, कांचन सदाशिवे, सविता अभ्यंकर, रतनकुमार साळवे, सुजाता सातदिवे, कल्याण सातदिवे आदी मान्यवर उपस्थित होते.


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी
D.M.L.T
Diploma In Medical Laboratory Technology
- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला अॅडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103


महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ जून २०२६

# भूमिजनांच्या वेदनेची कविता : जीव रानात गहाण - डॉ प्रभाकर शेळके




कवीवर्य अशोक क.गायकवाड यांच्या कवितेचा आस्वाद म्हणून ही कविता मर्मग्राही काळजाची हाक झालीआहे.या कवितेचा आत्मा हा माय माती अन् शिवार आरती आहे म्हणून ही कविता काळीज मनाचा निर्झर होऊन जाते.ही कविता गाव शिवार,नातीगोती आणि बाईपणाच्या वेदना, मुखर करते.शेती माती धस्कट इळा,जीव होई आळापीळा,हे शेती मातीच्या मुक्या अलवार वेदना आहेत.उभ्या आयुष्याचं गहाणखत इमाने इतबारे घेऊन जगणारा हायतभर मातीशी इमान राखणारा तो भूमिजन.आजच्या समकालीन वास्तवाचे जात व भान देऊन जातांना ही कविता मन गहिवरून अनंते.या कविताचे आत्मिक बळ ही शेती शिवाराची माती आहे.इतकं भरघोस पिकवून ही त्याला न पुस्ता भाव ठरवणारी व्यवस्था.ही सर घेऊन येणारी ही कविता आहे.जीव मातीत गहाण ठेवून इथल्या कुणब्याला शेतकऱ्यांना जगावे लागते आहे. "एका एका पिकासाठी,जीव रानात गहाण जीव लावणी निंदणी,सदा वादळी सपान तुझे येणे रे वांझोटे,करी मुखी घास कडू. ठेव निती मातीसाठी,नको वादळून पडू"(पृ.२२)अशी अस्सल सल उजागर करीत ही कविता आली आहे.शेतशिवार व मायमातीचं ऋण ही कविता अतिशय दुखरी सल उजागर करते.या कवितेचा आत्मा हा कष्टकरी कृषक असल्याने ही कृषवल दुखण्याची सल अतिशय संयत मनोभूमिकेतून अस्सल ठणक व्यक्त करते.या मातीची कुस भरण्याचं काम हा महिपती युगांपासून करतो आहे.पण या नियतिच्या खेळात त्याला नेहमीच दगाफटका बसतो आहे.या कापल्या रक्ताळलेल्या हाताचे मोल कुणालाच करता येत नाही पण जाणुन बुजुन या नंग्या संस्कृतीला याकाळीज नाही अशी संयत भूमिका घेते.अनेक सुख दु:खाचे डोंगर पचवणारा ही कुणबी डोंगर यांनी रानाच्या गोतावळ्यात जगतो.यातच त्याला त्याच्या कष्टाची शिदोरी मिळते आणि चव ही कळते.भाकरीची खरी नीती सांगताना ही आम्हाला आमच्या घामाचे योग्य ते द्या म्हणजे शेती धोरणात आली पाहिजे नुसत्या महासत्तेच्या भुसक्या गप्पा हानुन जमणार नाही.कारण दिवसरात्र हा शेतकरी जीव रानात गहाण ठेवून आपल्या मातीच्या उदरासाठी तिच्या भरणपोषणासाठी अतोनात कष्ट उचलतो 'रोज पेटते चूल'ही आयुष्याच्या जगण्या मरण्याची ढणकणारी चूल आहे ती विझली तर भाकरी ,पीठ मीठ या संसारीक जगण्याला अर्थच उरणार नाही.म्हणून कवी अशोक गायकवाड यांची अष्ठक्षरी रचना तितक्याच जोरकसपणे व्यक्त होते.कांदा पिकांच्या व्यथेचा हुंकार ही कविता देऊन जाते.'व्यवस्थेच्या पायाखाली' ही कविता. "मुळ छाटले कधीचे,पात कापली हिरवी. कष्ट घाव सोसूनही,तुझी कुणा रे थोरवी. वारा भिरभिर येता, दुर उडशील आता.व्यवस्थेच्या पायाखाली.तुझा सापडला माथा"(पृ.२४)ही भळभळणारी जखम शेतकऱ्यांच्या वाट्याला कायमचं आहे.या जगाचे सारथी म्हणून घेताना या कृषकांचे सतत हेटाळणीचं होते आहे.शेतकऱ्याचं जिणं म्हणजे केवळ आपल्या माय मातीचा माथा मळवट भरलेला म्हणजे ती कायमचं अहेवपणाचं जगणं जगली पाहिजे.माती आणि बाई ती आप सर्वस्वाचं देणं देऊन जाते.'लेक हळवी कदर'या मायाळू स्नेहाळू भावनेचा ओलावा म्हणजे लेक.जी दोन घराण्याचं लौकिक करते.ती मातृत्व देणारी.नाळ नात्याचा प्रेमळ अनुबंध या कवितेचा आहे.मातीशी कष्टवंत होऊन जेव्हा ओंजळभर सुखाची अपेक्षा करणारी माय माऊली पोटाला मारते तसं बाईचं सारं आयुष्य म्हणजे कष्ट.तर शेती हा बापाचा वारसा आहे.या मातीत राबून रानाचा वसा आणि वारसा जपण्याचं काम बापजाद्याची शेती आहे पडीत पडता कामा नये.तिच्या उदरात मुठभर पेरलं की गाडीभर येणारचं आहे.हा बापाचा वारसा.म्हणू ओढ जिवाची पांघर आपल्या शेतीमातीच्या ऋणाईत राहेच असेल तर ही मुक्याजीवाला वैरण पाणी करावीच लागते ही दुवा आहे.'आईपणाला जागते, आहे डोंगरोचं बाज,बाप झिजतो पणात,ओली हूंदक्या भाकर,असो बाईच जाणती, नको धनी हराया,काम एक काम,येतं डोळ्यात पाणी,काय सोडली मातीने,बाप निती जमान्याची ढग दैवत पंगती,लेक आसव पालखी.या संपुर्ण कवितेचा मर्मग्राही आत्मा म्हणजे माय बाप शेती माती अन् रक्ताची नाती गोती लेक परायचं धन जरी असलं तरी तिचं मायेचं अगर पारखं झालं की, सासरची वाटचं जाचाची वहिवाट होऊन जाते.आजच्या ग्रामीण वास्तवाचे सम्यक भान देतांना ही कविता शेती मातीशी इमान घेऊन येतेचं पण एक हळव्या नात्याची विण सुध्दा गुफंते.या कविता साज आणि बाज हा बोली शैलीच्या अंगाने आल्याने ही कविता काळजाचा ठाव घेते.अष्ठक्षरी लय असल्याने ती अस्सल आत्मानंद देते.ज्या शेतकऱ्यांनं शेतं विकून लेक उजवली ती आसवांची पालखी मन पिळवटून टाकते.कवीने माझ्या डोळ्या देखत माझा गावं सुखी व्हावा अशी प्रार्थना केली आहे.या आजच्या भयानक वास्तवाचे चटके म्हणजे बारभाई खेती झाली आहे.म्हणून या व्यवस्थेशी तडजोड करताना 'जीव मेल्या मढ्यागत' होतांना उद्याच्या स्वप्नांचा चकवा देताना कुणब्यांच्या वाट्याला आलेलं दुखरी सल उजागर करणारी ही कविता आहे.'असा फुटला कापूस,नवे वाढली संकट, वंगाळ पाऊस, तुझ्या कुंकवाच्या खाली, वात्सल्याचे थवे,आसू लागलेत फाशी,असा मयाळ जिव्हाळा,जग होईल हो सुखी, उभं पीक कणसाळ,हिवताची रानं,सोस थकल्या जीवाचे, सापा मुंगसाचे दावे,नवा शिकला पाहिजे,जग रहाटीत मरतो आहे,या कवितेचा आधार म्हणजे आत्मिक बळ देऊन जाते.मातीही जगण्याची उर्मी आहे.हजारो संकट येतील पण नव्या आशेनं कुणबी संघर्ष करीत माय मुठीतली माती सोडणारच नाही.हा आशावाद ही कविता देऊन जाते.जसे "सव्वा महिन्याची नाळ, वात्सल्याची हृदयात आईपण ओले जरी, जीव कष्टून तुझ्यात. हसू ओठात पोटात,खंत नाही पिढीजात. जन्मभरल्या ताटात,गोत्र कोयता हातात"(पृ.६५) हीकविता समृद्ध सकारात्मक विचारधारा पेरते कारण आम्ही या भूमीनिष्ठ भूमीजनांच्या कुशीतले आहोत.आमचं गोत्रचंकोयता आहे.तेंव्हा संघर्ष अटळ आहे.ही कविता रडतं कुढत बसतं नाही.कारण 'जीव रानात गहाण'असल्याने फक्त आता रुमण हातात घेऊन अन् कोयता पाजळून या व्यवस्थेच्या मानगुटीवर बसायचं आहे.इतकी अढळ निष्ठावंत ही कविता निर्धार घेऊन आली आहे.जेष्ठकवीडॉ कैलास दौंड सर लिहितात "माती आणि मातीच्या घुसमठीची कविता.शेतीप्रधान समजल्या जाणाऱ्या देशात शेतीत प्रगती व्हावी,उत्पादन वाढीवे,सकसता वाढावी या हेतूने कृषी विद्यापीठे स्थापन झाली.मात्र कृषी क्षेत्रातील संशोधन शेतीत सर्वदूर पोहोचले नाही.अर्थात पारंपरिक पद्धतीने केली जाणारी शेती अजूनही आतबट्याची, बेभरवशाची ठरत असल्याचे वास्तव आहे.शेती हेच उपजिविकेचे साधन असणाऱ्या शेतकऱ्यांना मातीची कुस भरवत राहावी लागते."सूर्य उगवतो डुबतो,कष्ट मांडतो जन्माची, शेतकरी संसारात,कुस भरतो मातीची.ही साक्षात ओळख ही कविता देते.(पृ.८) अस्सल व्यथा वेदनेची ठणक व्यक्त तर करतेच पण भूमिजनांचा कैवार घेऊन ही कविता संयत साकार होते.'कांदा जिवजड,कष्ट कुजून जातात,गाव पांढ्या उभ्या दुण्या,बाई जात्यातील दाणी,एक राबतो विठ्ठल,धनी निघावा मैतर, बाईपण होते वग, बाईच्या उभ्या जिनगाणिचा वग पाहिला तर तिनं शिव्या शाप खातचं,गुराढोरावाणी सारं खातचं उभं आयुष्याचं वगनाट्य करतं ती निर्धाराने जगत राहिली. आपल्या लेकरासाठी पण आत्महत्या नाही केली.अशी ही कविता बाईचा वग घेऊन येते.अभिमान्यू आयुष्याचा, मातीसाठी होतो माती,बळीचं राज्य येतं नाही,काशा,तांडे,सधन व्हायला लागल्यावर, अन्नसाखळी,वांझोटी माती, नेमकं भरणी आल्यावर, अजूनही खेड्यात,उधाया, आमच्या गद्दारीने,आई नाही म्हणते,बैल ठेविती इमान,धसकट अशा संपन्न सृजन समर्पक विवेचक समृद्ध सकारात्मक या कविता आहेत.सन्मित्र गेयकवी नारायण खरातपाटील सृजनशील शब्द स्नेहाळू भावनेचा अनुबंध बांधतांना मनस्वी पाठराखण करतात "मळलेल्या मातीतून अन् उधाणल्या छातीतून व्यक्त होताना त्यांची व्याकुळता मनाला अस्वस्थ करते.मुक्या वेदनांच्या रानात कळवळणारा जीव कवीचा असतो.अशा अश्राप मातीचा हुंकार होऊन वावरणाऱ्या कवी अशोक गायकवाड त्यांच्या कवितेतल्या भाव प्रकटनातून भावव्याकुळ होतांना दिसतात.अशा घातआघाताने सोशिकतेचा लळा सोसत शेतकरी बहुल समाजाचं प्रतिनिधित्व कवी करतो"(ब्लर्ब)मुखपृष्ठ -अरविंद शेलार यांनी 'धसकट,ईळा अन् रानात जाणारी मायी'अतिशय सृजनशील आशय संपन्न सृजन समर्पक मुखपृष्ठ झाले आहे.कवीस हार्दिक शुभेच्छा.

**पुस्तक : जीव रानात गहाण (कविता)कवी लेखक:-अशोक कचरू गायकवाड प्रकाशक:-परिस पब्लिकेशन, सासवड पुणे.मुखपृष्ठ:-अरविंद शेलार प्रथमवृती:-१४ नोव्हेंबर २०२३मूल्य:-१५०/रुपये पुस्तक**



**परिचय - डॉ प्रभाकर शेळके, जालना मो.९९७५१३७३३७**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ जून २०२६


# असहमतीचा सन्मान हीच लोकशाहीची खरी ओळख

लोकशाही ही केवळ निवडणुकांची यंत्रणा नसते. ती एक संस्कृती असते, एक जीवनमूल्य असते. मतभेदांना स्थान देणे, विरोधी मतांचा आदर राखणे आणि संघर्षाला संवादाच्या माध्यमातून उत्तर देणे ही लोकशाहीची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे जेव्हा राजकीय मतभेदांचे रूपांतर हिंसाचारात होते, तेव्हा प्रश्न एखाद्या पक्षाचा किंवा नेत्याचा राहत नाही; तो लोकशाहीच्या आरोग्याचा आणि समाजाच्या प्रगल्भतेचा बनतो. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्यावर झालेल्या कथित हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कोणत्याही राजकीय नेत्यावर किंवा कार्यकर्त्यावर होणारा हिंसक हल्ला हा केवळ त्या व्यक्तीवरील आघात नसतो; तो लोकशाही पद्धतीवरील अविश्वासाचे आणि असहिष्णुतेच्या वाढत्या प्रवृत्तीचे प्रतीक असतो. भारतीय लोकशाहीची ताकद तिच्या विविधतेत आहे. भाषा, धर्म, जात, प्रदेश, विचारधारा आणि राजकीय भूमिका यांमध्ये प्रचंड वैविध्य असतानाही देशाची लोकशाही टिकून आहे, कारण संविधानाने सर्वांना समान अधिकार दिले आहेत. या व्यवस्थेत विरोधक हा शत्रू नसतो; तो लोकशाही प्रक्रियेचा आवश्यक घटक असतो. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष हा विचारांचा असतो, अस्तित्वाचा नसतो. वास्तविक पाहता अलीकडच्या काळात राजकीय विरोधकांकडे प्रतिस्पर्धी म्हणून नव्हे तर शत्रू म्हणून पाहण्याची प्रवृत्ती वाढताना दिसते. सोशल मीडियावरील विषारी प्रचार, द्वेषपूर्ण भाषा, वैयक्तिक बदनामी आणि प्रत्यक्ष हिंसाचाराच्या घटनांनी सार्वजनिक संवादाची पातळी खालावली आहे. मतभेदांना उत्तर देण्यासाठी तर्क, पुरावे आणि संवाद याऐवजी आक्रमकता आणि धमक्यांचा वापर वाढू लागला, तर लोकशाहीचा आत्माच कमकुवत होतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान सभेत केलेल्या शेवटच्या भाषणात ‘संवैधानिक मार्गांचा अवलंब’ करण्याचा जो आग्रह धरला होता, तो आज अधिक महत्त्वाचा वाटतो. त्यांनी इशारा दिला होता की, संविधान अस्तित्वात आल्यानंतर संघर्ष, आंदोलन आणि राजकीय बदलांसाठी घटनात्मक मार्गच स्वीकारले गेले पाहिजेत. लोकशाहीत बदल घडवून आणण्याचे साधन मतदान, चर्चा, जनमत आणि कायदेशीर प्रक्रिया असतात; हिंसा नव्हे. हिंसा कोणत्याही विचारधारेची असो, तिचे समर्थन लोकशाहीत होऊ शकत नाही. कारण हिंसा तर्काला संपवते आणि भीतीला जन्म देते. ज्या समाजात भीती वाढते, तेथे स्वातंत्र्य कमी होते. ज्या समाजात स्वातंत्र्य कमी होते, तेथे लोकशाही केवळ नावापुरती उरते. लोकशाहीची खरी कसोटी निवडणूक जिंकण्यात नसते; ती विरोधी मत ऐकून घेण्याच्या क्षमतेत असते. ज्याला असहमती सहन होत नाही, त्याला लोकशाहीही समजलेली नसते. त्यामुळे राजकीय पक्ष, कार्यकर्ते आणि नागरिक या सर्वांनी मिळून मतभेदांना हिंसेत नव्हे तर संवादात रूपांतरित करण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. विचारांची लढाई विचारांनीच लढली गेली पाहिजे. परंतु अलीकडच्या काळात झुंडशाही, धमक्या आणि हिंसक मार्गांचा अवलंब करून विरोधी विचारांना दडपण्याच्या प्रवृत्ती वाढताना दिसत आहेत. वैचारिक विरोधकांचे अस्तित्वच नाकारण्याची मानसिकता लोकशाहीसाठी धोकादायक ठरू शकते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य, स्वतंत्र प्रसारमाध्यमे आणि सत्तेला प्रश्न विचारण्याचा अधिकार ही लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत. जेव्हा या मूल्यांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाव निर्माण होतो, तेव्हा लोकशाहीची गुणवत्ता खालावू लागते. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारताची ताकद विविध मतप्रवाहांना सामावून घेण्यात आहे; त्यामुळे वैचारिक बहुलता आणि लोकशाही संस्थांचे स्वातंत्र्य जपणे आवश्यक आहे.. राजकीय हिंसेचा सर्वात धोकादायक परिणाम म्हणजे समाजात निर्माण होणारे ध्रुवीकरण. हिंसेनंतर लोक दोन गटांत विभागले जातात, आपले आणि परके. त्यानंतर सत्य, न्याय आणि मानवी मूल्यांपेक्षा पक्षनिष्ठा महत्त्वाची ठरू लागते. अनेकदा राजकीय स्वार्थासाठी जात, धर्म, भाषा, प्रदेश आणि विविध सामाजिक गटांमध्ये तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न होतात. अशा विभाजनकारी प्रवृत्ती लोकशाहीसाठी अत्यंत चिंताजनक आहेत. भारतीय संविधान प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते. हा अधिकार केवळ सहमती व्यक्त करण्यासाठी नाही; तर असहमती व्यक्त करण्यासाठीही आहे. विरोध हा लोकशाहीचा शत्रू नसून तिचा पाया आहे. ज्या व्यवस्थेत विरोधाचा आवाज दाबला जातो, ती व्यवस्था लोकशाही रहात नाही. मात्र असहमती व्यक्त करण्याचा अधिकार आणि हिंसाचार करण्याचा अधिकार यात मूलभूत फरक आहे. आंदोलन, निदर्शने, मोर्चे, निवेदने, सार्वजनिक चर्चा आणि न्यायालयीन लढाई हे लोकशाहीतील वैध मार्ग आहेत. दगडफेक, धमक्या, मारहाण आणि भीतीचे वातावरण निर्माण करणे हे लोकशाहीच्या चौकटीबाहेरील अवैध प्रकार आहेत. या संदर्भात आणखी एक गंभीर प्रश्न म्हणजे मानवतेचा. जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या राजकीय भूमिकेमुळे उपचार नाकारले जात असतील किंवा त्याच्याशी भेदभाव केला जात असेल, तर तो केवळ वैद्यकीय नैतिकतेचा भंग नाही; तर मानवी सभ्यतेलाच काळिमा फासणारा प्रकार आहे. डॉक्टरांचा धर्म रुग्णाला वाचवणे हा असतो. रुग्णाची जात, धर्म, भाषा, पक्ष, विचारधारा किंवा सामाजिक ओळख यांचा उपचाराशी काहीही संबंध नसतो. रुग्णालये ही मानवतेची सेवा करणारी ठिकाणे मानली जातात. तेथे राजकीय पूर्वग्रहांना स्थान असू नये. जर उपचाराचाही अधिकार राजकीय चष्म्यातून पाहिला जाऊ लागला, तर समाजाची नैतिक घसरण सुरू झाल्याचे ते लक्षण मानावे लागेल. आज देशात राजकीय स्पर्धा तीव्र होत आहे. ही स्पर्धा लोकशाहीसाठी चांगली असू शकते, पण ती द्वेषात बदलू नये. जीवघेणी ठरू नये. विरोधकांचा पराभव मतपेटीत व्हावा, रुग्णालयात, रस्त्यावर, आवाज दाबून किंवा हिंसक जमावाच्या हातून नव्हे. कारण लोकशाहीत विजयाचा मार्ग जनतेच्या विश्वासातून जातो, भीतीतून नाही. म्हणूनच प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांना संयम, सहिष्णुता आणि घटनात्मक मूल्यांचे शिक्षण देणे आवश्यक आहे. राजकीय नेतृत्वानेही आपल्या भाषणातून आणि कृतीतून लोकशाही संस्कृतीचा आदर्श निर्माण केला पाहिजे. शब्दांतील आक्रमकता अनेकदा रस्त्यावरच्या हिंसेत परिवर्तित होत असते, हे विसरून चालणार नाही. लोकशाहीचे रक्षण केवळ संविधानाच्या पुस्तकाने होत नाही; ते संविधान जगणाऱ्या नागरिकांमुळे होते. नागरिकांच्या मनात जर परस्पर आदर, सहिष्णुता, समुह भावना आणि संवादाची वृत्ती नसेल, तर कोणतीही लोकशाही दीर्घकाळ टिकू शकत नाही. आज जगभर लोकशाहीसमोर उभे राहिलेले सर्वात मोठे आव्हान म्हणजे वाढती असहिष्णुता. मतभेदांना शत्रुत्व समजण्याची प्रवृत्ती वाढत आहे. सोशल मीडियामुळे माहितीचा प्रसार वेगाने होतो, पण त्याचबरोबर अफवा, द्वेष आणि ध्रुवीकरणही वाढते. त्यामुळे लोकशाही केवळ राजकीय संस्थांची नव्हे, तर सामाजिक जबाबदारीचीही परीक्षा बनली आहे. भारतातील लोकशाहीची ताकद तिच्या संवादक्षमतेत आहे. महात्मा गांधींपासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत अनेक विचारवंतांनी संघर्षाला वैचारिक दिशा दिली. त्यांनी मतभेद व्यक्त केले, पण हिंसेचा मार्ग स्वीकारला नाही. म्हणूनच त्यांचे विचार आजही प्रेरणादायी ठरतात. राजकीय हिंसा कोणत्याही रंगाची असो, तिचा निषेध समान निकषांवर झाला पाहिजे. अन्यथा नैतिकतेची विश्वासार्हता नष्ट होते. आपला पक्ष हिंसा करतो तेव्हा मौन बाळगणे आणि विरोधक हिंसा करतात तेव्हा निषेध करणे, ही भूमिका लोकशाहीच्या मूल्यांना बाधक ठरते. न्याय आणि नैतिकता यांना पक्षीय सीमा नसतात. अशा घटनांची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. कायद्याचा धाक आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास टिकून राहणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. जेव्हा नागरिकांना न्याय मिळेल याची खात्री असते, तेव्हा ते हिंसेकडे वळत नाहीत. शेवटी प्रश्न एका घटनेचा नाही. प्रश्न असा आहे की आपण कोणत्या प्रकारचा समाज घडवू इच्छितो? दगडांच्या आवाजात हरवणारा समाज की संवादातून मार्ग शोधणारा समाज? विरोधकांचा द्वेष करणारा समाज की मतभेद असूनही एकमेकांचा आदर राखणारा समाज? लोकशाहीची खरी शक्ती बहुमतात नसते; ती असहमतीचा आदर करण्याच्या क्षमतेत असते. दगड क्षणिक भय निर्माण करू शकतात, पण तर्क आणि संवादच शाश्वत परिवर्तन घडवू शकतात. म्हणूनच आजची सर्वात मोठी गरज आहे. हिंसेऐवजी संवाद, द्वेषाऐवजी सहिष्णुता आणि संघर्षाऐवजी संविधानावर विश्वास. लोकशाही वाचवायची असेल, तर असहमतीचा अधिकार जपला पाहिजे; पण हिंसेला कधीही वैधता देता कामा नये. कारण लोकशाहीची हार विरोधकांच्या विजयाने होत नाही, ती हिंसेच्या विजयाने होते.

**- प्रभाकर गायकवाड**
**छत्रपती संभाजीनगर**

## प्रा. रामदास कोळी प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त



**उमरगा(प्रा.नागसेन कांबळे)** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात तेहतीस वर्षापासून कार्यरत असलेले विद्यार्थीप्रिय शिक्षक प्रा. रामदास गणपत कोळी हे आपल्या प्रदीर्घ अध्यापन सेवेनंतर आज सेवानिवृत्त झाले.त्यामुळे संस्था व महाविद्यालयाच्या वतीने त्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गुलाब राठोड हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीकृष्ण शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रभाकर तात्या हिरवे हे उपस्थित होते.उपाध्यक्ष व अध्यक्षांच्या हस्ते दोघा उभयतांचा यथोचित सत्कार व सन्मान करण्यात आला.यावेळी बोलताना "ते एक उत्तम प्राध्यापक म्हणून व निष्णात भूगोल विषयातील तज्ञ म्हणून परिचित होते .एक व्यक्ती म्हणून आणि भूगोल विषयातील तज्ञ प्राध्यापक म्हणून त्यांचा नावलौकिक होता. आम्ही गेली अनेक वर्ष एकत्रितपणे काम केले असून त्यांचा मला अत्यंत जवळून परिचय आहे "असे संबोधून प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी त्यांच्या प्रदीर्घ सेवेचे कौतुक करत यापुढील भावी आणि निरोगी आयुष्यासाठी व पुढील वाटचालीसाठी मनपूर्वक शुभेच्छा दिल्या.यावेळी प्रा.आर.एन.निगडे आणि इतर सहकाऱ्यांनी त्यांच्या विषयी समुचित मनोगते व्यक्त करत दीर्घायुष्यासाठी मंगल कामना व्यक्त केल्या.आपण दिलेले सहकार्य आणि प्रेम मी आयुष्यभर माझ्या हृदयात कायम आठवणीत ठेवत ,जेव्हा माझी गरज वाटेल तेव्हा कधीही मी आपल्या सेवेत उपलब्ध असेन असे अभिवाचन देत प्रा.रामदास कोळी यांनी सत्काराला उत्तर दिले.प्रा.डॉ.डी.पी.चव्हाण यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व उपस्थितांचे आभार मानले.यावेळी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०१ जून २०२६

# पालक : जीवनाचे पहिले विद्यापीठ - डॉ. राजेंद्र बगाटे




दरवर्षी १ जून हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक पालक दिन' म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघाने २०१२ मध्ये या दिवसाला अधिकृत मान्यता देत जगभरातील पालकांच्या योगदानाचा गौरव करण्याचा निर्णय घेतला. या दिवसामागील मूलभूत उद्देश म्हणजे पालकांनी आपल्या मुलांच्या संगोपनासाठी, शिक्षणासाठी, संरक्षणासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी केलेल्या निःस्वार्थ त्यागाचे स्मरण करणे होय. मानवी जीवनाच्या जडणघडणीत पालकांची भूमिका इतकी महत्त्वपूर्ण असते की त्याशिवाय कोणत्याही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाची कल्पनाही करता येत नाही. व्यक्तीच्या जन्मापासून ते तिच्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत पालकांचे प्रेम, मार्गदर्शन, त्याग आणि प्रेरणा तिच्यासोबत असते. त्यामुळेच पालक हे केवळ जन्मदाते नसून जीवनाचे शिल्पकार, संस्कारांचे निर्माते आणि व्यक्तिमत्त्वाचे खरे घडवणारे असतात.मानवी समाजात कुटुंब ही सर्वात प्राचीन आणि महत्त्वाची सामाजिक संस्था मानली जाते. या संस्थेच्या केंद्रस्थानी पालक असतात. कुटुंबातील आई-वडील हे मुलांच्या जीवनातील पहिले शिक्षक, पहिले मार्गदर्शक आणि पहिले आदर्श असतात. बालक जेव्हा या जगात येते तेव्हा त्याला कोणतीही भाषा, ज्ञान किंवा सामाजिक नियम माहिती नसतात. हळूहळू तो आपल्या पालकांकडून बोलणे, चालणे, विचार करणे, वागणे आणि समाजाशी जुळवून घेणे शिकत असतो. मुलांच्या जीवनातील पहिली शाळा म्हणजे त्यांचे घर आणि पहिले शिक्षक म्हणजे त्यांचे पालक. त्यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत पालकांची भूमिका अत्यंत मूलभूत आणि निर्णायक असते.भारतीय संस्कृतीमध्ये पालकांना देवतुल्य स्थान देण्यात आले आहे. आईला प्रथम गुरु मानले जाते, कारण बालकाच्या जीवनातील पहिला संस्कार तिच्याकडूनच होतो. आईच्या मायेचा स्पर्श, तिचे वात्सल्य, तिची ममता आणि तिचा त्याग हे शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. मूल नऊ महिने आपल्या उदरात वाढविण्यापासून ते त्याच्या प्रत्येक गरजेची पूर्तता करण्यापर्यंत आई अनेक संकटांचा सामना करत असते. दुसरीकडे वडील हे कुटुंबाचा आधारस्तंभ असतात. कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ते आयुष्यभर परिश्रम घेतात. मुलांच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी आणि भविष्याच्या सुरक्षिततेसाठी ते सतत झटत असतात. आई आणि वडील या दोघांच्या प्रेम, त्याग आणि समर्पणामुळेच मुलांचे जीवन घडत असते.पालकत्व ही केवळ जैविक जबाबदारी नसून ती एक सामाजिक, नैतिक आणि भावनिक बांधिलकी आहे. मूल जन्माला घालणे सोपे असले तरी त्याला योग्य प्रकारे वाढविणे, संस्कार देणे आणि सक्षम नागरिक बनविणे हे मोठे आव्हान असते. पालक आपल्या मुलांसाठी अनेक स्वप्ने पाहतात आणि ती पूर्ण करण्यासाठी आयुष्यभर मेहनत घेतात. अनेक वेळा स्वतःच्या इच्छा, आकांक्षा आणि सुखसोयींचा त्याग करून ते आपल्या मुलांच्या भविष्यासाठी संघर्ष करत असतात. मुलांचे यश पाहून त्यांना मिळणारा आनंद हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा पुरस्कार असतो. म्हणूनच पालकांचे प्रेम हे निःस्वार्थ, निरपेक्ष आणि शाश्वत मानले जाते.समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर व्यक्तीच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. सामाजिकीकरण म्हणजे व्यक्तीला समाजातील मूल्ये, नियम, परंपरा आणि संस्कृती शिकविण्याची प्रक्रिया होय. ही प्रक्रिया सर्वप्रथम घरातून सुरू होते. मुलांमध्ये प्रामाणिकपणा, शिस्त, सहकार्य, करुणा, आदर, सहिष्णुता आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या मूल्यांची रुजवात पालकच करतात. मुलांनी समाजात जबाबदार नागरिक म्हणून वावरावे यासाठी आवश्यक असलेले नैतिक शिक्षण त्यांना घरातूनच मिळते. त्यामुळे समाजातील चांगल्या किंवा वाईट प्रवृत्तींच्या निर्मितीत पालकांच्या भूमिकेचे विशेष महत्त्व आहे.आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जीवनशैलीत मोठे बदल झाले आहेत. इंटरनेट, स्मार्टफोन, सामाजिक माध्यमे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या तंत्रज्ञानामुळे माहितीचे जग मुलांसाठी खुले झाले आहे. या बदलांमुळे अनेक संधी निर्माण झाल्या असल्या तरी अनेक नवीन आव्हानेही निर्माण झाली आहेत. मुलांच्या मानसिक, सामाजिक आणि नैतिक विकासावर तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव दिसून येत आहे. अशा परिस्थितीत पालकांची जबाबदारी अधिक वाढली आहे. मुलांना तंत्रज्ञानाचा योग्य वापर शिकविणे, त्यांना चुकीच्या माहितीपासून दूर ठेवणे आणि डिजिटल जगातील धोक्यांविषयी जागरूक करणे हे पालकांसाठी अत्यावश्यक झाले आहे.आजच्या स्पर्धात्मक युगात अनेक पालक आपल्या मुलांना उत्कृष्ट शिक्षण आणि उत्तम करिअर मिळावे यासाठी प्रयत्नशील असतात. परंतु अनेकदा या प्रयत्नांमध्ये मुलांवर अनावश्यक अपेक्षांचे ओझे टाकले जाते. प्रत्येक मुलाची क्षमता, बुद्धिमत्ता, आवड आणि व्यक्तिमत्त्व वेगळे असते. त्यामुळे मुलांची तुलना इतरांशी करणे किंवा त्यांच्याकडून अवास्तव अपेक्षा ठेवणे योग्य नाही. पालकांनी मुलांच्या क्षमतांचा आदर करून त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात प्रोत्साहन दिले पाहिजे. मुलांना यशाइतकेच अपयश स्वीकारण्याची ताकद देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कारण जीवनात यश आणि अपयश हे दोन्ही अपरिहार्य आहेत.मुलांच्या मानसिक आरोग्याच्या दृष्टीने पालकांची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते. वाढती स्पर्धा, शैक्षणिक ताण, सामाजिक दबाव आणि डिजिटल माध्यमांचा प्रभाव यामुळे अनेक मुले मानसिक तणावाचा सामना करत आहेत. काही वेळा नैराश्य, चिंता, एकाकीपणा आणि आत्मविश्वासाचा अभाव यांसारख्या समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांचे मित्र बनून त्यांना भावनिक आधार देणे आवश्यक असते. मुलांच्या भावना समजून घेणे, त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि त्यांना योग्य मार्गदर्शन करणे हे सुदृढ पालकत्वाचे लक्षण आहे. प्रेम आणि विश्वास यांच्या आधारे निर्माण झालेले नाते मुलांच्या मानसिक आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.शिक्षण क्षेत्रात पालकांचे योगदान अनन्यसाधारण आहे. शाळा, महाविद्यालये आणि शिक्षक ज्ञान देतात; परंतु शिक्षणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्याचे कार्य पालक करतात. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, अभ्यासासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध करून देणे आणि जिज्ञासू वृत्तीला प्रोत्साहन देणे हे पालकांचे महत्त्वाचे कार्य आहे. संशोधनातून असे दिसून आले आहे की ज्या मुलांच्या शिक्षणात पालकांचा सक्रिय सहभाग असतो, त्या मुलांची शैक्षणिक प्रगती अधिक चांगली होते. त्यामुळे शिक्षण प्रक्रियेत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.भारतीय समाजात कुटुंबव्यवस्थेला विशेष महत्त्व आहे. पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धतीमुळे मुलांच्या संगोपनात आजी-आजोबा, काका-काकू आणि इतर नातेवाईकांचा सहभाग असायचा. या वातावरणात मुलांना विविध अनुभव आणि संस्कार मिळत असत. परंतु शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि स्थलांतरामुळे विभक्त कुटुंब पद्धती वाढत आहे. परिणामी पालकांवर मुलांच्या संगोपनाची संपूर्ण जबाबदारी येत आहे. या बदलत्या परिस्थितीत पालकांनी मुलांना कौटुंबिक मूल्यांची जाणीव करून देणे आणि नातेसंबंधांचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक झाले आहे.स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीने पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेदभाव न करता दोघांनाही समान संधी देणे ही काळाची गरज आहे. शिक्षण, आरोग्य, करिअर आणि निर्णयप्रक्रियेत समानता राखल्यास समाज अधिक प्रगत आणि न्याय्य बनू शकतो. मुलींना शिक्षणासाठी आणि स्वावलंबनासाठी प्रोत्साहन देणारे पालक समाजपरिवर्तनाचे खरे वाहक ठरतात. आज अनेक क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय यश मिळविले आहे आणि त्यामागे त्यांच्या पालकांचे प्रोत्साहन आणि पाठबळ महत्त्वाचे ठरले आहे.डिजिटल युगातील पालकत्व हा आधुनिक समाजासमोरील एक महत्त्वाचा विषय आहे. आजची मुले लहान वयापासूनच स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या संपर्कात येत आहेत. यामुळे ज्ञानवृद्धीच्या संधी वाढल्या असल्या तरी व्यसनाधीनता, सायबर गुन्हे, ऑनलाइन छळ आणि सामाजिक माध्यमांचा अतिरेकी वापर यांसारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत पालकांनी मुलांच्या ऑनलाइन क्रियाकलापांवर लक्ष ठेवणे, त्यांना सायबर सुरक्षिततेबद्दल माहिती देणे आणि तंत्रज्ञानाचा जबाबदारीने वापर करण्याचे शिक्षण देणे आवश्यक आहे.मुलांच्या चारित्र्यनिर्मितीत पालकांचे योगदान अमूल्य आहे. समाजात वाढत असलेली हिंसा, भ्रष्टाचार, असहिष्णुता आणि नैतिक मूल्यांचा ऱ्हास लक्षात घेता मुलांमध्ये चांगल्या संस्कारांची रुजवात करणे अत्यंत आवश्यक आहे. सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा, परिश्रम, सहकार्य आणि मानवता यांसारख्या मूल्यांची शिकवण घरातूनच मिळाली पाहिजे. पालक स्वतःच्या आचरणातून मुलांसाठी आदर्श निर्माण करतात. मुलांना उपदेशापेक्षा उदाहरणांचा अधिक प्रभाव पडतो. त्यामुळे पालकांचे वर्तन आणि जीवनशैली मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर थेट परिणाम घडवितात.कामकाजी पालकांची संख्या वाढत असताना पालकत्वाची आव्हानेही बदलत आहेत. अनेक माता आणि पिता नोकरी, व्यवसाय आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करतात. आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी दोघांनाही काम करावे लागते. अशा वेळी मुलांना पुरेसा वेळ देणे कठीण होते. परंतु मुलांसाठी केवळ आर्थिक सुविधा पुरेशा नसतात. त्यांना प्रेम, सहवास, संवाद आणि भावनिक आधाराचीही गरज असते. त्यामुळे पालकांनी आपल्या व्यस्त जीवनातून मुलांसाठी दर्जेदार वेळ काढणे आवश्यक आहे.विशेष गरजा असलेल्या मुलांच्या संगोपनात पालकांचे योगदान विशेष गौरवास्पद असते. अशा मुलांच्या विकासासाठी अधिक संयम, वेळ आणि समर्पण आवश्यक असते. अनेक पालक सामाजिक आणि आर्थिक अडचणींवर मात करून आपल्या मुलांना शिक्षण, उपचार आणि स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देतात. त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. अशा पालकांचा सन्मान आणि त्यांना आवश्यक ते सहकार्य करणे ही समाजाची जबाबदारी आहे.पालक आणि मुलांमधील संवाद हा सुदृढ नात्याचा पाया आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे अनेकदा संवादात अंतर निर्माण होते. परिणामी गैरसमज आणि भावनिक दुरावा वाढू शकतो. या समस्येवर मात करण्यासाठी पालकांनी मुलांशी मोकळेपणाने संवाद साधणे आवश्यक आहे. मुलांच्या विचारांचा आदर करणे, त्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे आणि त्यांच्या भावनांना महत्त्व देणे यामुळे विश्वासाचे नाते निर्माण होते. असे नाते मुलांच्या आत्मविश्वास आणि भावनिक विकासासाठी उपयुक्त ठरते.वृद्धापकाळातील पालकांची काळजी घेणे हे प्रत्येक व्यक्तीचे नैतिक कर्तव्य आहे. बालपणी ज्यांनी आपल्या मुलांसाठी अथक परिश्रम घेतले, त्यांना वृद्धावस्थेत प्रेम, आदर आणि आधार मिळणे आवश्यक आहे. परंतु आधुनिक जीवनशैलीमुळे अनेक वृद्ध पालक एकाकीपणाचा सामना करताना दिसतात. काही वेळा त्यांना दुर्लक्षित केले जाते किंवा वृद्धाश्रमांचा आधार घ्यावा लागतो. ही स्थिती चिंताजनक आहे. पालकांचा सन्मान करणे, त्यांच्यासोबत वेळ घालविणे आणि त्यांच्या गरजांची काळजी घेणे हे केवळ कर्तव्य नाही तर संस्कारांचे प्रतीक आहे.जागतिक पालक दिन हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नाही; तो आत्मपरीक्षण करण्याचा दिवस आहे. पालकांच्या योगदानाची जाणीव करून घेणे, त्यांच्या त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या दिवसाचा खरा उद्देश आहे. आपल्या जीवनातील प्रत्येक यशामागे पालकांचे मार्गदर्शन, प्रेरणा आणि आशीर्वाद असतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाची कदर करणे आवश्यक आहे.राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. उद्याचे नागरिक आजच्या घरांमध्ये घडत असतात. मुलांमध्ये देशप्रेम, सामाजिक जबाबदारी, लोकशाही मूल्ये आणि मानवतेची भावना रुजविण्याचे कार्य पालक करतात. सक्षम, सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक घडविणारे पालक हे खऱ्या अर्थाने राष्ट्राचे शिल्पकार असतात. समाजाचा विकास, राष्ट्रीय प्रगती आणि मानवी मूल्यांचे संवर्धन यामागे पालकांचे अप्रत्यक्ष परंतु प्रभावी योगदान असते.आजच्या बदलत्या काळात पालकत्वाचे स्वरूप बदलत असले तरी त्याची मूलभूत मूल्ये कायम आहेत. प्रेम, त्याग, समर्पण, जबाबदारी, संरक्षण आणि संस्कार ही पालकत्वाची शाश्वत वैशिष्ट्ये आहेत. मुलांच्या आनंदात आनंद मानणारे, त्यांच्या यशासाठी स्वतःचे सुख बाजूला ठेवणारे आणि त्यांच्या भविष्यासाठी आयुष्यभर झटणारे पालक हे समाजाचे खरे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या निःस्वार्थ प्रेमामुळेच मानवी जीवन अधिक सुंदर, सुरक्षित आणि अर्थपूर्ण बनते.जागतिक पालक दिनाच्या निमित्ताने आपण प्रत्येकाने आपल्या पालकांविषयी आदर, प्रेम आणि कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. त्यांना वेळ देणे, त्यांचे विचार ऐकून घेणे, त्यांच्या त्यागाची जाणीव ठेवणे आणि त्यांच्या सन्मानाचे रक्षण करणे हीच त्यांच्याप्रती खरी कृतज्ञता ठरेल. पालकांचा सन्मान जिथे केला जातो, तिथे संस्कार, मूल्ये आणि मानवता जिवंत राहतात. सुदृढ कुटुंब, सुसंस्कृत समाज आणि समृद्ध राष्ट्रनिर्मितीसाठी पालकांचे योगदान अनमोल आहे. म्हणूनच १ जूनचा जागतिक पालक दिन हा केवळ दिनविशेष नसून प्रेम, कृतज्ञता, संस्कार आणि मानवी नात्यांच्या अमूल्यतेची जाणीव करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे. पालकांचे ऋण कधीही फेडता येत नसले तरी त्यांच्या त्यागाचा सन्मान करून, त्यांच्या मूल्यांचा वारसा जपून आणि त्यांच्या प्रेमाची कदर करून आपण त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करू शकतो. हाच जागतिक पालक दिनाचा खरा संदेश आणि सार आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल -**
**bagate.rajendra5@gmail.com**